# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी ११ ते १७ जुलै २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

''हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे''

### हवामानासंबंधी सल्ला

| | जुलै मधील पाऊस (मि.मी मध्ये) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | सल्ला |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | |
| नागपूर | ७ | ४.९ | ७ | १ | २ | १ | २ | महाराष्ट्रातील कापसाचे पीक घेणाऱ्या सर्व जिल्हयात पेरणीला पुरेसा होईल ऐवढा पाऊस झालेला आहे. पाणी साठविण्याचे उपाय ताबडतोब करणे गरजेचे आहे. सुरूवातीला पेरणी झालेल्या पिकांसाठी पाण्याचा योग्य निचरा होणे गरजेचे आहे. काही जिल्हयात येणाऱ्या सततच्या पावसामुळे कापसातील तणांचे व्यवस्थापन करणे अवघड होत आहे. त्यासाठी उगवणीनंतर वापरण्याची तणनाशकांचा जसे की क्विझालफॉप / प्रोक्यूझाकॉप / पायरीथायोबॅक यांचा वापर करावा. जेव्हा जमिन आंतर मशागत आणि खुरपणी करणे योग्य असेल तेव्हा खुरपणी आणि आंतर मशागत करून घ्यावी. उशीरा पेरणी झालेल्या पिकांना येणाऱ्या आठवडयात पाण्याचा ताण पडण्याची शक्यता आहे. जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. सर्वसाधारणपणे परभणी, बुलढाणा, अकोला, वाशीम आणि नंदुरबार जिल्हयातील एकूण कापसाच्या क्षेत्रापैकी जवळजवळ ४० टक्के पेक्षा कमी क्षेत्रात कापसाची लागण झाली आहे. जर कापसाची पेरणी १० जुलैपर्यंत चालू राहिली तर उशीरा पेरणी झालेल्या कापसासाठी खासकरून शेती अर्थव्यवस्थेचे उपाय करणे गरजेचे आहे. ज्याठिकाणी पिकांची वेळेवर पेरणी झालेली आहे त्याठिकाणचे कापसाचे पीक २०—३० दिवसाचे आहे. अद्याप कुठल्याही किडीचा व रोगांचा प्रार्दुभाव कापसात दिसून आलेला नाही. पिकांचे क्षेत्र तणविरहीत ठेवण्यासाठी काळजी घ्यावी. खतांची मात्रा देताना काळजी घ्यावी कि स्फुरद आणि पालाश याची पूर्ण मात्रा दयावी आणि नत्राची जास्त मात्रा देणे टाळावे. सर्वत्र होणाऱ्या भरपूर पावसामुळे होणाऱ्या नत्राची नुकसान टाळण्यासाठी चांगले कुजलेले शेणखत आणि गांडुळखतांचा वापर करावा. सध्या स्थितीत पिकासाठी कोणत्याही प्रकारच्या रासायनिक किटकनाशकांचा वापर करू नये. |
| वर्धा | ६.६ | १५.२ | ६ | १ | ० | ० | ० | |
| चंद्रपूर | ३६.२ | ९५.५ | ७ | १ | २ | ० | ३ | |
| यवतमाळ | २६.४ | ५०.६ | ६ | १ | ० | ० | ० | |
| अमरावती | ५३.३ | ३७.४ | ७ | २ | ५ | २ | २ | |
| अकोला | ७२.९ | ९०.६ | ७ | २ | २ | ० | २ | |
| बुलढाणा | ५३.९ | ७९.३ | ७ | ६ | ६ | २ | ६ | |
| परभणी | १३.९ | ५२.८ | १४ | ० | ० | ० | ३ | |
| नांदेड | ३४.९ | ८६.७ | १२ | ० | ३ | ० | ३ | |
| बीड | ७.८ | ३.७ | ५ | ० | ० | ० | ३ | |
| वाशिम | ३०.२ | ६२.९ | ११ | २ | ० | ० | ० | |
| धुळे | ५८.९ | १२.६ | १०१ | ५० | ४ | ३ | ७ | |
| जळगांव | ७५.२ | ४४.२ | १२१ | १० | १५ | ४ | १२ | |
| जालना | ४४.३ | ३५.२ | ७ | ० | ० | ० | ४ | |
| औरंगाबाद | ६८.१ | २०.५ | ५८ | १० | ५ | ० | ५ | |

| आख्यायिक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मि.मी. मध्ये) | < ५ | ५-२० | २०-५० | ५०-८० | >८० |
| | | | | | |

संदर्भ:— http://nwp.imd.gov.in/bias/dist_fcst.htm